05 AUG 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. कामत यांना समर्पित कामाचे फलित मिळाले

## कुलगुरू डी. टी. शिर्के : त्यांच्या रूपाने आता डॉ. होमी भाभा विद्यापीठाशी नवे ऋणानुबंध

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कुलगुरुपदी नियुक्ती हे डॉ. आर. के. तथा रजनीश कामत यांनी उच्चशिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने केलेल्या कामाचे फलित आहे. त्यांच्या रूपाने आता डॉ. होमी भाभा विद्यापीठासमवेत शिवाजी विद्यापीठाचे नवे ऋणानुबंध व साहचर्य संबंध प्रस्थापित होतील, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी केले.

विद्यापीठातर्फे आयोजित कुलगुरू डॉ. कामत यांच्या सत्कारावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. संस्थेप्रति समर्पित भावनेतून काम करणारी माणसे दुर्मिळ होत आहेत. अशा दुर्मिळ व्यक्तींपैकी डॉ. कामत हे एक आहेत. अध्यापन आणि प्रशासन या दोहोंचे योग्य संतुलन सांभाळत त्यांनी विद्यापीठासाठी बहुमोल योगदान दिले असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. आपली नवी कारकीर्द ते निश्चितपणे यशस्वी करतील, असा विश्वास प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी व्यक्त केला. आपल्या क्षमता आणि मर्यादांसह नव्या जबाबदारीला न्याय देण्याचा आणि शिवाजी विद्यापीठाचे नाव उंचावण्याचा निश्चित प्रयत्न राहील, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. कामत यांनी दिली.

या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, गजानन पळसे, आलोक जत्राटकर, आशिष घाटे, अनुष्का कदम, अभिजित रेडेकर यांनी मनोगते व्यक्त केली. या वेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले आदी उपस्थित होते.



कोल्हापुरात गुरुवारी डॉ. होमी भाभा विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचा सत्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केला. या वेळी डावीकडून पी. एस. पाटील, वैभव ढेरे, व्ही. एन. शिंदे, अजित चौगुले आदी उपस्थित होते.

### समतेचा विचार माझ्या रक्तातच

सामाजिक समतेच्या विचारांचा वारसा माझ्या रक्तातच आहे. कागल येथील माझे आजोबा शाहू महाराजांचे डॉक्टर होते. त्यांचे बाबासाहेबांशीही स्नेहाचे संबंध होते. हा वैचारिक वारसा जोपासतच आजवरची वाटचाल केली आहे. यापुढेही करत राहणार आहे, असे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
05 AUG 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समर्पितपणे केलेल्या कामाचे फळ

## कुलगुरू डॉ. शिर्के; कुलगुरू डॉ. कामत यांचा सत्कार

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ४ :** डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती हे डॉ. रजनीश कामत यांनी उच्चशिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने केलेल्या कामाचे फलित आहे, असे गौरवोद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. डॉ. कामत यांच्या सत्कार समारंभात आज ते बोलत होते.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रजनीश कामत यांची काल सायंकाळी डॉ. होमी भाभा राज्य समूह विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून नियुक्ती झाल्याची घोषणा राजभवनातून झाली. या पार्श्वभूमीवर आज सकाळी प्रशासनातर्फे डॉ. कामत यांचा सत्कार केला. समारंभाच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. शिर्के म्हणाले, 'संस्थेप्रती समर्पित भावनेतून काम करणारी माणसे दुर्मिळ होत आहेत. अशा दुर्मिळ व्यक्तींपैकी डॉ. कामत हे एक आहेत. अध्यापन आणि प्रशासन यांचे योग्य संतुलन सांभाळत त्यांनी विद्यापीठास बहुमोल योगदान दिले आहे. 'नॅक'चे सर्वोत्कृष्ट मानांकन मिळवून दिलेच; पण अनुभवाचा लाभ संलग्नित महाविद्यालयांबरोबरच राज्यातील व देशातील विविध विद्यापीठे व उच्चशिक्षण संस्थांनाही मिळवून दिलेला आहे. त्यांच्या रुपाने आता डॉ. होमी भाभा विद्यापीठाशीही शिवाजी विद्यापीठाचे नवे ऋणानुबंध व साहचर्य संबंध प्रस्थापित होतील.'

> **छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक समतेच्या विचारांचा वारसा माझ्या रक्तातच आहे. बी. एस. भणगे यांच्यापासून आजतागायत मला नऊ कुलगुरूंसमवेत काम करण्याची संधी लाभली. त्या सर्वांनी मला गुणदोषांसह स्वीकारले आणि काम करण्याची संधी दिली. त्यांच्या कार्यपद्धतीचा माझ्यावर प्रभाव आहे. आपल्या क्षमता आणि मर्यादांसह नव्या जबाबदारीला न्याय देण्याचा आणि शिवाजी विद्यापीठाचे नाव उंचावण्याचा निश्चित प्रयत्न राहील.**
>
> – **डॉ. आर. के. कामत,** कुलगुरू, डॉ. होमी भाभा विद्यापीठ, मुंबई



प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, गजानन पळसे, डॉ. आलोक जत्राटकर, आशिष घाटे, अनुष्का कदम आणि अभिजित रेडेकर यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्यासह अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्यनगरी

# डॉ. कामत यांच्या समर्पित कामाचे कुलगुरुपद हे फलित

## कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

होमी भाभा समूह विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती हे डॉ. रजनीश कामत यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने केलेल्या कामाचे फलित आहे, असे गौरवोद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी गुरुवारी काढले. विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रजनीश कामत यांची डॉ. होमी भाभा राज्य समूह विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून नियुक्ती झाल्याची घोषणा राजभवनकडून करण्यात आली. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे डॉ. कामत यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. त्या समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, डॉ. कामत हे सृजनशील व्यक्तिमत्त्वाचे धनी आहेत. विद्यापीठ प्रशासनासमोर कोणतीही समस्या अथवा प्रश्न उभा ठाकला की, त्यावर योग्य उपाय योजण्यासाठी सर्वप्रथम डॉ. कामत यांचेच नाव सामोरे येते.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, गजानन पळसे, डॉ. आलोक जत्राटकर, आशीष घाटे, अनुष्का कदम आणि अभिजित रेडेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

तरुण भारत

# संशोधक विद्यार्थिनींसाठी वसतिगृह उभारणार

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात संशोधक विद्यार्थीनींची संख्या वाढत आहे. त्यामुळे विद्यापीठ फंडातून ५० संशोधक विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारले जाणार आहे. सुरूवातीला १५ मुलींच्या राहण्याची व्यवस्था केली जाईल. त्यानंतर जशी संख्या वाढेल त्याप्रमाणे विद्यार्थीनींच्या राहण्याची व्यवस्था केली जाणार आहे. हा प्रस्ताव बुधवार १० ऑगस्ट रोजी होणाऱ्या व्यवस्थापन बैठकीत मंजूर झाल्यानंतर इमारतीच्या बांधकामाला सुरूवात होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठात संशोधक मुलांसाठी वसतिगृह आहे. परंतू संशोधक विद्यार्थीनींसाठी वसतिगृह नव्हते. त्यामुळे विद्यापीठ फंडातून २ कोटी रूपयांची तरतूद केली जाणार आहे. हिरक महोत्सवी वर्षानिमित्त या वसतिगृहाच्या बांधकामाला सुरूवात केली जाईल. कमवा व शिका मुलींच्या वसतिगृह परिसरातच या वसतिगृहाची उभारणी केली जाणार आहे. दिवसेंदिवस संशोधक विद्यार्थीनींची संख्या वाढत आहे. परंतू त्यांच्या राहण्याची सोय नसल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यंत राहण्यासाठी विद्यापीठात वसतिगृह आहे. परंतू पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर संशोधन करण्यासाठी सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील मुलींसाठी राहण्याची व्यवस्था होत नाही. या संशोधक विद्यार्थीनी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, म्हणून कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या संकल्पनेतून या वसतिगृहाची स्थापना केली जाणार आहे.

0 5 AUG 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ : ५१ विषयांच्या परीक्षा पार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२२ च्या उन्हाळी सत्राच्या एकूण ७४१ परीक्षांपैकी विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षांपैकी काही परीक्षांना १९ जुलैपासून एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने सुरळीतपणे सुरुवात झाली. यांतर्गत दि. ४ ऑगस्ट रोजी विविध अभ्यासक्रमांच्या ५१ विषयांच्या परीक्षा पार पडल्या. ४७ हजार ८५७ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी भरारी पथके सक्रिय होती. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी दिलेल्या सूचनेप्रमाणेच विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
0 5 AUG 2022
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधक विद्यार्थिनींसाठी विद्यापीठात वसतिगृह

## लवकरच बांधकामास सुरुवात; संशोधनास मिळणार चालना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनुसार संशोधक विद्यार्थिनींसाठी नवीन वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थिनींना प्रोत्साहन व संशोधनास चालना मिळणार आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात २७५ महाविद्यालये असून, विद्यार्थीसंख्या सुमारे २ लाख ५० हजार आहे. मुलींचे पदव्युत्तर शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

त्यात दिवसेंदिवस संशोधक विद्यार्थिनींची संख्या वाढत आहे. सद्यस्थितीत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात येणाऱ्या विद्यार्थिनींना राहण्याची सोय नाही. त्यातच आहे त्या मुलींच्या वसतिगृहात जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे विद्यापीठाकडून संशोधक विद्यार्थिनींसाठी ५० क्षमतेचे नवीन वसतिगृह उभारले जाणार आहे. त्याची प्रक्रिया सुरू झाली असून, लवकरच बांधकामास सुरुवात होणार आहे. संशोधक विद्यार्थिनींचे नवीन वसतिगृह उभारल्याने बाहेरील जिल्ह्यांतून खास संशोधन करण्यासाठी विद्यापीठात येणाऱ्या मुलींची राहण्याची सोय होणार आहे.

तरुण भारत

# विद्यापीठाकडून खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती

- यंदा सहा खेळाडूंना प्रत्येकी ५० हजार रुपयांची शिष्यवृत्ती
- मिशन ऑलिम्पिक डोळ्यासमोर ठेवून खेळाडूंना प्रोत्साहन



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत खेळाडूंना प्रोत्साहनपर क्रीडा शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. यंदा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या सुबिया मुल्लाणी, रोहन कांबळे, स्वाती शिंदे, अनुष्का पाटील, संकेत सरगर, नंदिनी साळोखे यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची प्रोत्साहनपर क्रीडा शिष्यवृत्ती दिली आहे.

विद्यापीठाच्या खेळाडूंनी बंगळुरू येथे झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत विविध क्रीडा प्रकारात २२ पदके प्राप्त करून देशात दहावा क्रमांक मिळवला. खेळाडूंना एखाद्या स्पर्धेला वेळेत पोहोचण्यासाठी विमानप्रवास खर्चही दिला जातो. विद्यापीठाने मिशन ऑलिम्पिक ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून नियोजन सुरू केले आहे. तसेच ३०० खेळाडूंसाठी विद्यापीठात वसतिगृह बांधणार आहे. इनडोअर स्पोर्टस कॉम्प्लेक्स तयार करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे. बाहेरगावी खेळासाठी गेल्यानंतर त्यांची कार्यक्षमता टीकून ड्रायफुड पॅकींग करून दिले जाते.

एकूणच विद्यापीठ खेळाडूंना ऑलिम्पिक स्पर्धेपर्यंत घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करीत आहे. क्रीडा विभागांतर्गत विविध अत्याधुनिक सुविधा केल्या आहेत. त्यामुळे सर्वच खेळाडूंना याचा फायदा होत आहे. तसेच व्यवस्थापन परिषदेचे सदस्य ॲड. धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली क्रीडा विकास समिती तयार केली असून ही समिती खेळाडूंना मदत करीत आहे. या समितीने खेळाडूंना भत्ता वाढवून दिला असून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

Times of India

# Shivaji university starts scholarship scheme for athletes

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) from this year has started a scholarship scheme for students, who have participated in national and international sporting events, for admission to colleges affiliated to the university.

A 300-bed sports hostel will also be built for the athletes. The university is working on the "Mission Olympics" concept and these facilities are going to be useful for developing athletes. The process of getting coaches from the Sports Authority of India (SAI) is underway.

The Kolhapur Jilha Nagri Kruti recently met SUK vice-chancellor Dr D T Shirke and put forth various demands following which the sports department took immediate decision on issues that have been pending due to the pandemic.

SUK in-charge sports officer P T Gaikwad said, "Sports scholarship scheme for national and international athletes taking admission in a SUK affiliated college is being started from the academic year 2022-23. As many as six athletes will also get an incentive of Rs 50,000 each."